| | |
|---|---|
| | दाखल तारीख – ०६/०४/२०१८ |
| | नोंदणी तारीख – ०६/०४/२०१८ |
| | निकाल तारीख – १०/०३/२०२६ |
| CNR No.MHRT080001802018 | कालावधी – ०७ वर्षे ११ महिने ०४ दिवस |

फॉर्म नं. **XXXII**

भाग ‘अ’

(फौजदारी नियमावलीचा पाठ **VI** चा परीच्छेद ४४ (**i**)

देवरुख येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात,

ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

(पिठासीन अधिकारी – रोहिणी रा. कुलकर्णी)

न्यायनिर्णय दिनांक १०/०३/२०२६

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७४/२०१८ निशाणी क्रमांक – ६१

प्रथम खबरी अहवालाचा तपशील –
गुन्हा नोंदणी क्रमांक – ०६/२०१८, दिनांक १६/०१/२०१८
पोलीस ठाणे – देवरुख, जि. रत्नागिरी.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासनतर्फे पोलीस ठाणे अंमलदार देवरुख पोलीस ठाणे, जि. रत्नागिरी.<br>**मुळ फिर्यादी** – प्रकाश दत्ताराम कदम, सहा.पो.फौ./१३९, देवरुख पोलीस ठाणे, ता.संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| उपस्थिती | श्री. ए. एल. दड्डेकर, सहा. सरकारी अभियोक्ता. |

| | |
|---|---|
| **आरोपी** | प्रदीप प्रताप पवार,<br>**वय –** ३० वर्षे, **व्यवसाय** – चालक,<br>**राहणार** – गारवाडा,<br>ता. माळशिरस, जि. सातारा. |
| **उपस्थिती** | श्री. आर. के. शिंदे, आरोपीतर्फे विधीज्ञ. |

**भाग ब**

**(फौजदारी नियमावलीचा पाठ VI चा परीच्छेद ४४ (ii)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १३/०१/२०१८ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | १६/०१/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०६/०४/२०१८ |
| दोषारोप निश्चीत झाल्याची तारीख | १७/०४/२०१८ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | १३/१२/२०१८ |
| प्रकरण न्यायनिर्णयास ठेवल्याची तारीख | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | १०/०३/२०२६ |
| प्रकरणात काही शिक्षा झाल्याची तारीख | निरंक |

**आरोपीचा तपशील**

| अ.क्र | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामिनावर मुक्त केल्याची तारीख | गुन्हयाचे कलम | दोषी ठरविले की, निर्दोष मुक्त केले | शिक्षा झाली असल्यास, तपशिल | संपरिक्षे दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रदीप प्रताप पवार | २२/०२/२०१८ | २२/०२/२०१८ | भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये. | आरोपीला निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

## (खुल्या न्यायालयात घोषित)

प्रस्तुत आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (संक्षिप्तमध्ये यापुढे भा.दं.वि.) चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये, शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयासाठी संपरीक्षा घेण्यात आली.

**०२.** अभियोगपक्षाच्या खटल्याचा थोडक्यात सारांश असा आहे की, दिनांक १३/०१/२०१८ रोजी १७:३० वाजताच्या सुमारास मौजे वांद्री, सप्तलिंगी पुलाजवळ, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, येथे मुंबई–गोवा हायवेवर आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटेनर वाहन क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ हे गोवा ते मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमाक १६६ वरुन घेवुन जात असताना हयगयीने, निष्काळाजीपणे, अविचाराने, अतिवेगात व रस्त्याच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवून चिपळुन ते रत्नागिरी अशी समोरुन येणारी मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ हिला ठोकर देवुन अपघात केला. सदर अपघातामुळे आरोपी हा मोटार सायकलस्वार याचे किरकोळ व गंभीर दुखापतीस व दोन्ही वाहनांच्या नुकसानीस कारणीभूत झाला.

**०३.** सदरच्या घटनेबाबत आरोपीने देवरुख पोलीस ठाणे येथे खबर दिली. त्यानुसार, मोटार अपघात क्रमांक ०३/२०१८ दाखल झाला. त्याची चौकशी प्रकाश

दत्ताराम कदम, सहा.पो.फौ./१३९, देवरुख पोलीस ठाणे यांनी केली. चौकशीदरम्यान त्यांनी घटनास्थळी जावुन घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द शासनातर्फे फिर्याद दिली. सदर फिर्यादीन्वये देवरुख पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदणी क्र. ०६/२०१८ दाखल झाला. सदर गुन्हयाचा तपास पुढे त्यांनीच केला आहे. संपूर्ण तपास झाल्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र क्रमांक १८/२०१८ दाखल केले.

**०४.** आरोपी प्रस्तुत खटल्याचे कामी हजर झाल्यानंतर माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक ०७ अन्वये भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये, शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयाचा तपशील निर्धारीत केला. आरोपीने गुन्हा नाकबूल केल्याने प्रस्तुत खटल्याचे काम चालविण्यात येत आहे. प्रस्तुत आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्रमांक ५८ कडे नोंदविण्यात आलेले असून त्यामध्ये आरोपीने नकारात्मक, खोटा खटला दाखल केल्याचा व अपघात त्याच्या चुकीमुळे झाला नसल्याचा बचाव घेतला आहे.

**०५.** प्रभारी विशेष सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांवरील निष्कर्ष त्यांच्या सबळ कारणांसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे –

| *अ.क्र.* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, दिनांक १३/०१/२०१८ रोजी १७:३० वाजताच्या सुमारास | **...नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | मौजे वांद्री, सप्तलिंगी पुलाजवळ, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, येथे मुंबई–गोवा हायवेवर आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटेनर वाहन क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ हे गोवा ते मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमाक १६६ वरुन घेवुन जात असताना हयगयीने, निष्काळजीपणे, अविचाराने, अतिवेगात रस्त्याच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन सार्वजनिक ठिकाणी चालवून मानवी जीवीतास किंवा त्यांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अशा रितीने चालविले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम २७९ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, वरील नमुद तारेखस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटेनर वाहन क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ हे गोवा ते मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमाक १६६ वरुन घेवुन जात असताना हयगयीने, निष्काळजीपणे, अविचाराने व अतिवेगात रस्त्याच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवून चिपळुन ते रत्नागिरी अशी समोरुन येणारी मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ हिला ठोकर देवुन अपघात करुन मोटारसायकलस्वार यास इच्छापूर्वक किरकोळ दुखापत केली व त्याद्वारे भा. दं. वि. चे कलम ३३७ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | **...नाही.** |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, वरील नमुद तारेखस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील | **...नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | कंटेनर वाहन क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ हे गोवा ते मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमाक १६६ वरुन घेवुन जात असताना हयगयीने, निष्काळजीपणे, अविचाराने, अतिवेगात व रस्त्याच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवून चिपळुन ते रत्नागिरी अशी समोरुन येणारी मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ हिला ठोकर देवुन अपघात करुन मोटारसायकलस्वार यास इच्छापूर्वक गंभीर दुखापत केली व त्याद्वारे भा. दं. वि. चे कलम ३३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | |
| ४. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, वरील नमुद तारेखस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमूद वाहन सार्वजनिक रस्त्यावरची परिस्थिती व वाहतुक विचारात न घेता सामन्यतेपेक्षा जास्त वेगाने व धोकादायक पध्दतीने चालवले व त्याद्वारे मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | **...नाही.** |
| ५. | काय आदेश? | **...आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ बाबत</u> –**

**०६.** सदर मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने व पुरावा एकत्रीत आल्याने

पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन पुढीलप्रमाणे एकत्रीतपणे नोंदविण्यात येत आहे. अनिकेत (अ.सा.क्र.०४) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक १३/०१/२०१८ रोजी ते वामन हरी पेठे ज्वेलर्स, शाखा रत्नागिरी येथे कॅशिअर म्हणून काम करायचे, मात्र त्यांना सेल्ससाठी व इतर कामांसाठी बाहेर जावे लागत असे. त्यादिवशी ते कामानिमित्त दुचाकी क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ ने गेले. सदरची गाडी कौस्तुभ श्रीनिवास गोरे यांची होती. चिपळुणकडुन रत्नागिरीकडे येत असताना त्यांचा वांद्री याठिकाणी पुलावर अपघात झाला. त्यावेळी ते चिपळुणकडुन रत्नागिरीकडे त्यांच्या डाव्या बाजुने जात होते. रत्नागिरी दिशेकडून येणारा कंटेनर क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ हा त्याच्या गाडीला येऊन धडकला. त्यांच्या गाडीला धक्का बसून ते डाव्या बाजूला पडले, त्यांच्या हाताला, पायाला व डोक्याला गंभीर दुखापती झाल्या. सदर अपघातात त्यांचा पाय निकामी झाल्याने तो उजवा पाय गुडघ्याच्या खाली काढुन टाकण्यात आलेला आहे. अपघातानंतर ते बेशुध्द पडले होते, त्यांना सांगण्यात आले की, अपघातानंतर त्यांना सर्वप्रथम रुग्णवाहीकेतून सिव्हील हॉस्पीटल, रत्नागिरीला नेण्यात आले. त्यानंतर त्यांना पुढील उपचाराकरता सीटी हॉस्पीटल, कोल्हापुर येथे हालविण्यात आले. सदरचा अपघात समोरुन येणाऱ्या ट्रेलरने धडक दिल्याने झाला. पोलीसांनी सदर घटनेविषयी त्यांच्याकडे माहीती घेतली होती. ते समोरुन येणाऱ्या ट्रेलर चालकाला पाहीले असल्याने आरोपीला ते ओळखु शकतात.

**०७**. अनिकेत (अ.सा.क्र.०४) यांनी उलटतपासात त्यांची अपघातानंतर देवरुख पोलीसांशी वैयक्तीक भेट झाली नसल्याचे कथन करुन पोलीसांनी दिनांक ०१/०२/२०१८ रोजी डिस्चार्ज देण्यात आला त्यावेळी त्यांच्याकडे चौकशी केली होती, असे कथन केले आहे. पुढे त्यांनी अपघात संध्याकाळी ०५:३० च्या दरम्याने झाला असल्याचे व त्यांच्याकडे बजाज कंपनीची विक्रांत मोटर सायकल होती, असे

कथन करुन चिपळुणचे काम आटोपून रत्नागिरीच्या त्यांच्या शाखेत तसा रिपोर्ट त्यांना द्यायचा होता, असे मान्य केले आहे. पुढे त्यांनी मुंबई गोवा हायवे सतत रहदारीचा असुन रत्नागिरीकडून चिपळुणच्या दिशेकडे जाताना अपघातस्थळावर वळण असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी ट्रेलर बराच मोठा असुन तो १४ चाकी असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी अपघाताविषयी विमा कंपनीमध्ये क्लेम केला होता, हे मान्य केले आहे. पुढे त्यांनी बचाव पक्षातर्फे विचारलेली विरोधी उत्तरसुचक प्रश्ने नाकारली आहेत.

०८. डॉ. पाटील (अ.सा.क्र.०५) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, सन – २००२ पासून ते वैद्यकीय क्षेत्रात सेवा करीत आहेत. अनिकेत प्रल्हाद शिवलकर नावाच्या रुग्णाला १४ जानेवारी २०१८ रोजी कोल्हापुर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. रस्ता अपघातामुळे अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांच्या उजव्या कंबरेला, डोक्यालाही दुखापत झाली होती. तसेच अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांचे उजव्या अंगात रक्ताभिसरण होत नसल्याने, प्लॅस्टिक सर्जन डॉ. अर्चना पवार यांच्याशी चर्चा केल्यानंतर, त्यांनी अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांच्या उजव्या पायाचे विच्छेदन करण्याचा निर्णय घेतला. अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांच्यावर सुरुवातीला पहिल्या सत्रात गुडघ्याखालील पाय विच्छेदन करण्यात आले व त्यानंतर, त्यांचा संपूर्ण पाय विच्छेदन करण्यात आला. अनिकेत प्रल्हाद शिवलकर हे दिनांक ०१/०२/२०१८ पर्यंत त्यांच्या रुग्णालयात दाखल होते. दिनांक १२/०३/२०१८ रोजी त्यांनी अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांच्या ८०.००% कायमस्वरूपी अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिले. डॉ. पाटील (अ.सा.क्र.०५) यांनी उलटतपासात बचाव पक्षातर्फे विचारलेली विरोधी उत्तरसुचक प्रश्ने नाकारली आहेत.

०९. संदिप (अ.सा.क्र.०६) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक १६/०१/२०१८ रोजी ते आरटीओ, रत्नागिरी येथे वाहन निरीक्षक म्हणुन कार्यरत असताना अपघातग्रस्त दुचाकी बजाज कंपनीची मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ व चारचाकी वाहन एक मोठा कंटेनर क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ यांचा यांत्रीकी निरीक्षक अहवाल द्यावयाचा असल्याचा त्यांच्या कार्यालयात बिनतारी संदेश देवरुख पोलीस ठाण्यामार्फत प्राप्त झाला होता. दिनांक १८/०१/२०१८ रोजी अपघातस्थळ मौजे वांद्री येथे उभा असलेला चारचाकी ट्रेलर व देवरुख पोलीस ठाण्याच्या आवारात असलेली दुचाकी यांची त्यांनी यांत्रीकी तपासणी त्या–त्याठिकाणी केली. चारचाकी वाहन कंटेनर हा रस्त्यावर चालविण्याच्या अवस्थेत होता, त्याचा उजव्या बाजुसमोरील बंपर वाकलेला होता, त्याचे ब्रेक, इंजीन, स्टेअरींग, गियर बॉक्स, Deferential हे सुस्थीतीत होते. सदरचे वाहन सुस्थीतीत असलेबाबत त्यांचे यांत्रीकी निरीक्षण अहवालानंतर मत होते. सदरचा अपघात वाहनामध्ये कोणत्याही यांत्रीकी बिघाडामुळे झाला नव्हता. तसा सदरचा कंटेनरचा त्यांच्या स्वाक्षरीचा निशाणी क्र. ५१ कडील यांत्रीकी निरीक्षण अहवाल पोलीसांच्या मागणीनुसार त्यांनी दिला. दुसरे अपघातग्रस्त वाहन बजाज कंपनीची दुचाकीची त्यांनी देवरुख पोलीस ठाण्याच्या अवारात तपासणी केली. तपासणीत त्यांच्या निदर्शनास आले की, दुचाकीच्या मागील उजव्या बाजुकडील सस्पेंशन तुटलेले, दुचाकीचे सायलेंसर ब्रॅकेट तुटलेले, दुचाकीचा उजवा व डावा आरसा फुटलेला, दुचाकीचा हँडल वाकलेला व दुचाकीची इंधन टाकीचे नुकसान झाले होते. सदरची दुचाकी Road Worthy Condition मध्ये नव्हती, सदरचे वाहन रस्त्यावर चालविण्याच्या सुस्थीतीत नसल्याने त्याबाबत कोणतेही मत

अहवालात देण्यात आले नव्हते. तसा सदर दुचाकीचा त्यांच्या स्वाक्षरीचा निशाणी क्र. ५२ कडील यांत्रीकी निरीक्षण अहवाल पोलीसांच्या मागणीनुसार त्यांनी दिला.

१०. संदिप (अ.सा.क्र.०६) यांनी उलटतपासात अहवालात निरीक्षण करतेवेळी वाहन प्रत्यक्ष चालवून बघितले, असे नमूद नसल्याचे अमान्य केले आहे. पुढे त्यांनी गुन्हयाची फिर्याद न वाचता Point of impact of damage या रकान्यात As per Police FIR असे नमूद केले असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी अपघातग्रस्त वाहनाची लवकरात लवकर आरटीओ तपासणी होणे गरजेचे असते, हे मान्य केले आहे. पुढे त्यांनी बचाव पक्षातर्फे विचारलेली विरोधी उत्तरसुचक प्रश्ने नाकारली आहेत.

११. लवेश (अ.सा.क्र.०१) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक १६/०१/२०१८ रोजी ते चिपळुनहुन येत असताना रस्त्यावर एक दुचाकी क्रमांक एमएच–०८–अेअेल–२२६७ ही वांद्री सप्तलिंगी पुलाजवळ होती. त्याठिकाणी पोलीसांनी त्यांचेसमक्ष निशाणी क्रमांक १४ कडील पंचनामा करुन त्यांची त्यावर स्वाक्षरी घेतली. सदर मोटारसायकलचे नुकसान झाले होते. मोटारसायकल क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ यास ट्रेलरने ठोकर दिली होती. सदरचा ट्रेलर साधारण अडीच किलोमीटर अंतरावर उभा होता. पोलीसांनी त्यावेळी गाडीचे आर्टीकल – ए कडील ०४ फोटो व आर्टीकल ब कडील एक फोटो काढला.

१२. लवेश (अ.सा.क्र.०१) यांनी उलटतपासादरम्यान अपघातातील जखमी मुलाचे नाव अनिकेत शिवलकर असे असल्याचे व शिवलकर हा वामन हरी पेठे ज्वेलर्समध्ये गेली दोन वर्षे तेथे कामास असुन त्याची त्यांच्यासोबत चांगली ओळख

असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी अनिकेत शिवलकर याचेसोबत चांगले संबंध असल्याने त्यांनी निशाणी क्रमांक १४ कडील पंचनाम्यावर सही केली असल्याचे व फोटो व पंचनाम्यावरील सहया त्यांनी देवरुख पोलीस स्टेशनला केल्या असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी घटनास्थळ सतत रहादारीचे असुन अपघात १३ तारखेला घडला असुन त्यांनी सही १६ तारखेला केली असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी अपघात घडताना त्यांनी प्रत्यक्ष पाहिले नसल्याने अपघातात काय स्थीती होती, हे त्यांना सांगता येणार नसल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी ट्रेलरने ठोकर दिली अगर कसे हे त्यांना प्रत्यक्ष माहिती नसल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी गाडीचे नुकसान किती झाले हे सांगणारे ते तज्ञ नसल्याचे मान्य करुन काचा व गाडीचे पार्ट तुटून मध्य दुभाजकाच्या पश्चिम दिशेला पडले होते, हे मान्य केले आहे. पुढे त्यांनी पोलीसांनी त्यांच्यासमक्ष फोटो काढले नसल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी बचाव पक्षातर्फे विचारलेली विरोधी उत्तरसुचक प्रश्ने नाकारली आहेत.

**१३**. मारुती (अ.सा.क्र.०२) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक १६/०१/२०१८ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकरीता बोलावले होते. सदरचा अपघात सप्तलिंगी पुलाजवळ झाला होता. तेथे एक दुचाकी क्रमांक – २२६७ पडली होती. दिनांक १६/०१/२०१८ रोजी पोलीसांनी निशाणी क्रमांक १४ कडील पंचनाम्यावर त्यांची स्वाक्षरी घेतली. त्या व्यतिरिक्त त्यांनी अन्य काहीही पाहिलेले नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नसल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलटतपासाच्या स्वरुपातील प्रश्न विचारले असता त्यामध्ये त्याने घटनास्थळापासुन पुढे टाटा ट्रेलर क्रमांक ८१८ उभा होता, हे मान्य केले आहे. पुढे त्याने त्यांच्यासमक्ष वाहनाचे व घटनास्थळाचे काढलेले फोटो आर्टीकल अ वर व जखमीचा फोटो आर्टीकल बी कडे असल्याचे व त्यावर त्यांची स्वाक्षरी असल्याचे कथन

केले आहे.

**१४.** मारुती (अ.सा.क्र.०२) यांनी उलटतपासादरम्यान असे कथन केले आहे की, ते वांद्री गावचे पोलीस पाटील असुन त्यांचे पोलीस ठाण्यात येणे जाणे असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी पोलीसांशी ओळख असल्याचे मान्य केले असुन केवळ पोलीसांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सही केली असल्याचे अमान्य केले आहे. पुढे त्यांनी अपघात झाला त्यादिवशी त्यांनी पंचनाम्यावर सही केली असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी अपघात झाल्यानंतर ट्रेलर पोलीस स्टेशनला दुसऱ्या दिवशी सकाळी उभा केला असल्याचे व ते जेव्हा घटनास्थळी गेले तेव्हा वाहतुक सुरळीत चालू होती, हे मान्य केले आहे. पुढे त्यांनी मोटारसायकलचा पुर्ण नंबर त्यांना सांगता येणार नसल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी त्यांच्याकडे व्हीजीट बुक दिलेले असते, हे मान्य करुन पंचनाम्याला गेले तर त्याची नोंद व्हीजीट बुकमध्ये करणे गरजेचे असते व त्यांनी पंचनाम्याकरीता गेल्याची नोंद व्हीजीट बुकमध्ये नसल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी त्यांच्याकडे पोलीस आल्याची नोंद देखील त्यात केलेली नसल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी अपघातस्थळ त्यांच्या नेहमीचे येण्या–जाण्याचे असल्याचे मान्य करुन रस्त्याबाबत त्यांना चांगली माहिती असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी शिवलकर व्यक्तीस त्यांनी आजपर्यत पाहिलेले नसल्याचे व ट्रेलरचा क्रमांक त्यांना सांगता येणार नसल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी बचाव पक्षातर्फे विचारलेली विरोधी उत्तरसुचक प्रश्ने नाकारली आहेत.

**१५.** कौस्तुभ (अ.सा.क्र.०३) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक १३/०१/२०१८ रोजी ते रत्नागिरी येथे दुकानातच होते. अनिकेत प्रल्हाद शिवलकर हा त्यांच्या कंपनीमध्ये कॅशिअर म्हणून काम करतो. दिनांक १३/०१/२०१८ रोजी अनिकेत प्रल्हाद शिवलकर याला कार्यालयाच्या कामासाठी

चिपळूण येथे जाण्यासाठी त्यांनी त्यांची दुचाकी एमएच–०८–एएल–२२६७ ही अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांना दिली होती. चिपळूण येथे काम झाल्यानंतर अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांनी त्यांना फोन करुन चिपळून मधून निघाला असल्याचे कळविले. त्यानंतर त्यांना फोन आला की, वांद्री सप्तलिंग पूल येथे अनिकेत प्रल्हाद शिवलकर याचा अपघात झाला आहे. त्यांना सांगण्यात आले की, अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांना उपचाराकरीता रत्नागिरी येथे आणले जात आहे. त्यांना सांगण्यात आले की, अनिकेत प्रल्हाद शिवलकर यांना एका ट्रेलर क्रमांक एमएच–४६–८१०८ ने ठोकर दिल्याने अपघात होवुन त्याचा पाय तुटला आहे. दिनांक १९/०१/२०१८ रोजी त्यांना पोलीस स्टेशनमधून कळविण्यात आल्यानंतर त्यांनी त्यांची दुचाकी देवरुख पोलीस स्टेशनमधून ताब्यात घेतली.

**१६**. कौस्तुभ (अ.सा.क्र.०३) यांनी उलटतपासात अपघात त्यांनी प्रत्यक्ष पाहिला नसुन निश्चीत अपघात कसा झाला याबाबत त्यांना माहिती नसल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी पोलीसांनी त्यांचे वाहन त्यांच्या ताब्यात दिल्याबाबत सही घेतली होती, असे कथन केले आहे. पुढे त्यांनी दिनांक १९/०१/२०१८ रोजी संध्याकाळी त्यांचे वाहन त्यांच्या ताब्यात देण्यात आले होते, असे कथन केले आहे. पुढे त्यांनी बचाव पक्षातर्फे विचारलेली विरोधी उत्तरसुचक प्रश्ने नाकारली आहेत.

**१७**. प्रस्तुत प्रकरणातील तपासीक अधिकारी मयत असल्याने त्यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. अभिलेखावर आलेला पुरावा पाहिला असता, अनिकेत (अ.सा.क्र.०४) यांची साक्ष पाहिली असता, त्यांनी दिनांक १३/०१/२०१८ रोजी दुचाकी क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ ने चिपळुनकडुन रत्नागिरीकडे जात असताना रत्नागिरीकडुन कंटेनर क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ ने धडक दिल्याने त्यांच्या हाताला, पायाला व डोक्याला गंभीर दुखापत होवुन

त्यांचा उजवा पाय निकाली झाल्याने गुडघ्याच्या खाली काढुन टाकण्यात आला असल्याचे त्यांनी कथन केले आहे. पुढे त्यांनी अपघातानंतर सर्वप्रथम सामान्य रुग्णालय, रत्नागिरी येथे व पुढे सिटी हॉस्पीटल, कोल्हापुर येथे त्यांना नेण्यात आल्याचे कथन केले आहे. परंतु, सामान्य रुग्णालय, रत्नागिरी यांचेकडील वैद्यकीय कागदपत्रे अभिलेखावर दाखल असल्याचे दिसुन येत नाही. सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासामध्ये घटनेची नेमकी वेळ कथन केली नाही. परंतु, उलटतपासात मात्र सदरचा अपघात संध्याकाळी ०५:३० वाजताच्या सुमारास झाला असल्याचे कथन केले आहे.

**१८.** पोलीसांकडील सदरचा साक्षीदाराचा नोंदविलेला जबाब पाहिला असता, त्यामध्ये दिनांक १३/०१/२०१८ रोजी १८:३० वाजताच्या सुमारास सदरचा अपघात झाला असल्याचे नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे, वेळेबाबत सदर साक्षीदाराची साक्ष व पोलीसांकडे नोंदविण्यात आलेल्या जबाबामध्ये तफावत असल्याचे दिसुन येते. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत कथन केल्याप्रमाणे, समोरुन येणाऱ्या ट्रेलरने धडक दिल्याने सदरचा अपघात झाला होता. संदिप (अ.सा.क्र.०६) यांनी त्यांच्या साक्षीत सदरचे ट्रेलर वाहन हे सुस्थीतीत असल्याचे कथन करुन तसा अहवाल दिला आहे.

**१९.** डॉ. पाटील (अ.सा.क्र.०५) यांच्या साक्षीतुन त्यांनी दिनांक १४/०१/२०१८ रोजी पासुन दिनांक ०१/०२/२०१८ पर्यंत अपघातातील जखमी अनिकेत शिवलकर याच्यावर उपचार केल्याचे दिसुन येते. अभिलेखावर डॉ. पाटील (अ.सा.क्र.०५) यांनी सदर जखमीचे दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र हे छायांकित स्वरुपात असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, ते पुराव्यात वाचता येणार नाही. जखमीचे मुळ वैद्यकीय प्रमाणपत्र अभियोगपक्षाने सादर न करण्याचे

कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर स्पष्ट केले नसल्याने सदर जखमीस गंभीर व किरकोळ दुखापती झाल्या होत्या, ही बाब अभियोगपक्षाने शंकेच्या पलीकडे जावुन सिध्द केलेली नाही.

२०. लवेश (अ.सा.क्र.०१) यांनी त्यांच्या सरतपासामध्ये निशाणी क्रमांक १४ कडील घटनास्थळ पंचनामा त्यांचेसमक्ष झाला असल्याचे कथन केले आहे. परंतु, उलटतपासात मात्र अपघातातील जखमी सोबत त्यांचे चांगले संबंध असल्याने पंचनाम्यावर त्यांनी सही केल्याचे व ज्या काही सहया केल्या त्या देवरुख पोलीस ठाण्यात केल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे, सदर साक्षीदारासमक्ष घटनास्थळ पंचनामा हा प्रत्यक्ष घटनास्थळी झाला होता, ही बाब अभियोगपक्षातर्फे शंकेच्या पलीकडे जावुन सिध्द करण्यात आली नाही.

२१. मारुती (अ.सा.क्र.०२) यांनी त्यांच्या सरतपासात निशाणी क्र. १४ कडील घटनास्थळ पंचनाम्यावर सही केल्याचे कथन केले आहे. उलटतपासात त्यांनी अपघात झाला त्याच दिवशी पंचनाम्यावर सही केल्याचे व अपघात झाल्यानंतर ट्रेलर दुसऱ्या दिवशी पोलीस ठाण्यात सकाळी उभा केला असल्याचे मान्य केले आहे. निशाणी क्रमांक १४ कडील घटनास्थळ पंचनामा पाहिला असता, सदरचा पंचनामा हा दिनांक १६/०१/२०१८ रोजी केल्याचे दिसुन येते. परंतु, अभियोगपक्षाच्या कहानीप्रमाणे सदरचा अपघात हा दिनांक १३/०१/२०१८ रोजी घडला असल्याचे म्हणणे आहे. त्यामुळे, मारुती (अ.सा.क्र.०२) यांचेसमक्ष देखील सदरचा घटनास्थळ पंचनामा प्रत्यक्ष घटनास्थळी तयार करण्यात आला होता, ही बाब स्पष्ट झालेली नाही.

२२. कौस्तुभ (अ.सा.क्र.०३) यांच्या साक्षीवरुन, केवळ त्यांची दुचाकी क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ ही त्यांनी अपघातातील जखमी अनिकेश

शिवलकर याला दिला होता, इतकीच बाब सिध्द होते. अपघात त्याने प्रत्यक्ष पाहिला नसल्याने तो कसा झाला याबाबत त्यांना माहिती नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्यामुळे, अपघाताविषयी सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास तशी फारशी उपयुक्त नाही.

**२३.** संदिप (अ.सा.क्र.०६) यांच्या साक्षीतुन निशाणी क्र. ५१ व ५२ कडे अपघातग्रस्त वाहनांचे यांत्रीकी निरीक्षण अहवाल सिध्द झालेले आहेत. परंतु, उलटतपासात मात्र त्यांनी गुन्हयाची फिर्याद न वाचता Point of impact of damage या रकान्यात As per Police FIR असे नमूद केले असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे सदरचा अहवाल देखील अभियोगपक्षास उपयुक्त असल्याचे दिसुन येत नाही.

**२४.** प्रस्तुत प्रकरणातील तपासीक अधिकारी यांनी गुन्हयाची फिर्याद दाखल केली आहे. सदरचे तपासीक अधिकारी मयत असले तरीही, अभियोगपक्षातर्फे तत्कालीन पोलीस ठाणे अंमलदार यांची साक्ष नोंदवुन सदरची फिर्याद सिध्द केलेली नाही. त्यामुळे, गुन्हयाची फिर्याद सिध्द झालेली नाही. अभिलेखावरुन, केवळ आरोपीस मोटार वाहन कायदा कलम २०९ अन्वये, नोटीस दिल्याचे दिसुन येते. सदरची नोटीस दुसरा वाहन चालक म्हणजेच अनिकेत (अ.सा.क्र.०४) यांनी न देण्याचे कारण अभिलेखावर स्पष्ट झालेले नाही. आरोपीला मोटार वाहन कायद्याचे कलम २०९ अन्वये, देण्यात आलेली नोटीस सिध्द झाली नसल्याने ती पुराव्यात वाचता येणार नाही. त्यामुळे, मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये, आरोपीला दोषी धरता येत नाही.

**२५.** एखाद्या अपघातामध्ये केवळ एका वाहनातील चालक/प्रवासी जखमी

झाल्यास दुसऱ्या वाहनातील चालकास दोषी धरता येत नाही. त्यासाठी अभियोगपक्षाने आरोपीने घटनेवेळी घटनास्थळी त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालविले, ही बाब सबळ पुराव्यानिशी सिध्द करणे गरजेचे असते. परंतु, प्रस्तुत खटल्यात तसा ठाम व सबळ पुरावा देण्यात आलेला नाही. त्यामुळे, सदर अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे घडल्याची बाब शंकेच्या पलीकडे जावुन सिध्द झालेली नाही. त्यामुळे, आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे. कलम २७९, ३३७ व ३३८ व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये, गुन्हा सिध्द झाला नसल्याने मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविले आहेत.

**मुद्दा क्रमांक ०५ बाबत** :–

**२६.** मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ च्या नकारार्थी निष्कर्षांमुळे व त्यावरील विवेचनावरुन, आरोपी हा प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. दोषारोपपत्रामध्ये जप्त मुद्देमालाचे वर्णन निरंक असल्याने त्याबाबतीत कोणताही आदेश नाही. सबब, मुद्दा क्रमांक ०५ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. आरोपी नामे – ***प्रदीप प्रताप पवार*** यास ***भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५ (१) अन्वये,*** निर्दोष मुक्त करणेत येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक व जामीनदाराचे बंधपत्र रद्द करणेत येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये रक्कम

रु. १५,०००/-(रूपये पंधरा हजार फक्त ) चे बंधपत्र द्यावे.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.04 17:39:51 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दिनांकः- १०/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवरुख,**

**स्थळः- देवरुख** **जि. रत्नागिरी.**

## परिशिष्ट I

## भाग क

## (फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI परीच्छेद ४४ (iii)

## साक्षीदारांची यादी

## अ. अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | नाव | | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | लवेश सिताराम तळेकर | निशाणी क्रमांक ०७ लगत | घटनास्थळ पंच |
| २ | मारुती किसन किर | निशाणी क्रमांक ०७ लगत | घटनास्थळ पंच |
| ३ | कौस्तुभ श्रीनिवास गोरे | निशाणी क्रमांक ३५ | साक्षीदार |
| ४ | अनिकेत प्रल्हाद शिवलकर | निशाणी क्रमांक ३७ | जखमी साक्षीदार |
| ५ | डॉ. प्रदिप पाटील | निशाणी क्रमांक ४८ | वैद्यकीय अधिकारी |
| ६ | संदिप राजाराम देसाई | निशाणी क्रमांक ५० लगत | साक्षीदार |

## बचावपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

| |
|---|
| निरंक |

**अभियोगपक्षातर्फे निशाणी क्रमांकांची यादी**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| **१** | १४ | घटनास्थळ पंचनामा |
| **२** | ५१ | चारचाकी वाहन क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ चा यांत्रीकी निरीक्षणाचा अहवाल |
| **३** | ५२ | दुचाकी वाहन क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ चा यांत्रीकी निरीक्षणाचा अहवाल |

**बचावपक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांकांची यादी**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**<u>मुद्देमाल</u>**

| अ.क्र. | मुद्देमालाचे क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.04 17:39:57 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दिनांकः– १०/०३/२०२६**

**न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवरुख,**

**जि. रत्नागिरी.**

**स्थळः– देवरुख**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Order/Judgment/Evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 10/03/2026 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 04/04/2026 |
| Judgment uploaded on | : | 04/04/2026 |